


# क्षमा - स्वत:साठी

हे सर्वोच्च परमेश्वरा
दैवी पिता,
दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
माझे अध्यात्मिक मार्गदर्शक,
समस्त अध्यात्मिक मार्गदर्शक,
माझे अध्यात्मिक सहाय्यक,
समस्त अध्यात्मिक सहाय्यक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ,

मी आहे ते मी आहे.

मी नम्रतापूर्वक दिव्य क्षमेसाठी कळकळीची विनंती करीत आहे, त्या सर्व चुकांसाठी ज्या जाणता - अजाणता माझ्या पूर्व जन्मी अथवा ह्या जन्मी मी केल्या आहेत. मी त्या सर्वांना क्षमा करीत आहे ज्यांनी माझ्याप्रती व माझ्या परिवाराप्रती चुका केल्या आहेत.

कृपया माझ्यातील सर्व भीती व शंका दूर कराव्यात.


मी क्षमा करत आहे आणि विसरत आहे.
मी क्षमा करत आहे आणि विसरत आहे.
मी क्षमा करत आहे आणि विसरत आहे

मी जाणीवपूर्वक त्याचा स्वीकार करीत आहे.
ह्याची पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे.

हे ईश्वरा, आपल्याला धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद,

(संपूर्ण जीवनभर अथवा निर्देशानुसार वाचणे).

Copyright @ All rights reserved

# क्षमा - परिवार सदस्यांसाठी (माता - पिता, भाऊ, बहिणी, मुले व जवळचे नातेवाईक)

हे सर्वोच्च परमेश्वरा,
दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
माझ्या परिवार सदस्यांचा ( त्यांची नावे)
उच्चतर आत्मा,
आपले अध्यात्मिक मार्गदर्शक व सहाय्यक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ,

ईश्वरा धन्यवाद आम्हाला एकत्र आणल्याबद्दल. मी त्या दैवी मार्गदर्शनाचा व योजनांचा स्वीकार करीत आहे.

मी विनम्रतेने दिव्य क्षमेसाठी कळकळीची विनंती करीत आहे.

(परिवार सदस्यांची नावे) जाणता - अजाणता ह्या जन्मी अथवा पूर्वजन्मी मी केलेल्या सर्व चुकांमुळे झालेल्या तीव्र दुःखासाठी कृपया मला क्षमा करावी.

माझ्याबरोबर तुम्ही केलेल्या सर्व चुकांसाठी मी विनम्रतेने क्षमा करीत आहे.


ईश्वरी प्रेम व आशीर्वाद सदैव तुमच्याबरोबर राहो.
(३ वेळा)

आपल्यामध्ये शांती व सुसंवाद सदैव राहो (३ वेळा)

ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद

(आवश्यकतेनुसार वाचणे)

Copyright @ All rights reserved

# क्षमा - सासरच्या परिवार सदस्यांसाठी (सासरा, सासू, दीर, नणंद, जावा व त्यांचे जवळचे नातेवाईक)

हे सर्वोच्च परमेश्वरा,
दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
माझ्या सासरच्या सदस्यांचा ( त्यांची नावे )
उच्चतर आत्मा,
आपले अध्यात्मिक मार्गदर्शक व सहाय्यक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ.

ईश्वरा धन्यवाद आम्हाला एकत्र आणल्याबद्दल ह्या दैवी मार्गदर्शनाचा व योजनेचा मी स्वीकार करीत आहे.

मी विनम्रतेने दिव्य क्षमेसाठी कळकळीची विनंती करीत आहे.

(सासरच्या सदस्यांची नावे) जाणता - अजाणता ह्या जन्मी अथवा पूर्व जन्मी मी केलेल्या सर्व चुका व दिलेले तीव्र दुःख ह्यासाठी कृपया मला क्षमा करावी.

माझ्या बरोबर व माझ्या परिवाराबरोबर तुम्ही केलेल्या सर्व चुकांसाठी मी विनम्रतेने क्षमा करीत आहे.


ईश्वरी प्रेम व आशीर्वाद सदैव तुमच्याबरोबर राहो
( ३ वेळा)

कृपया शांततेत जा. ( ३ वेळा)
आपल्यामध्ये शांती व सुसंवाद सदैव राहो ( ३ वेळा)

ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद,

( आवश्यकतेनुसार वाचणे)

Copyright @ All rights reserved

# क्षमा - पती /पत्नीसाठी

हे सर्वोच्च परमेश्वरा,
दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
माझ्या पती/पत्नी ( नाव) चा उच्चतर आत्मा,
आपले सर्व अध्यात्मिक मार्गदर्शक व अध्यापक,
आपले सर्व अध्यात्मिक सहाय्यक,
समस्त उपचारक देवदूत, महान कार्मिक मंडळ.

मी आहे ते मी आहे.

ईश्वरा धन्यवाद आम्हाला एकत्र आणल्याबद्दल आमच्या कर्म संतुलनासाठी धन्यवाद,
मी ह्या दैवी मार्गदर्शनाचा व योजनेचा स्वीकार करीत आहे.
जाणता - अजाणता तुमच्या/तुझ्या बरोबर आणि तुमच्या/तुझ्या परिवाराबरोबर मी केलेल्या सर्व चुकांसाठी क्षमायाचना करीत आहे.

मी तुम्ही केलेल्या सर्व चुका व खोल वेदनांसाठी तुम्हाला क्षमा करीत आहे.

माझ्या ( पती/पत्नीचे नाव) ला दैवी प्रेमाने, दैवी दयेने आणि दैवी करूणेने मी आशीर्वाद देत आहे.
दैवी प्रकाश ( त्यांचे /तिचे) सदैव रक्षण करो आणि ( त्यांना/ तिला ) ईश्वरी दिशेने मार्गदर्शन करो.

(त्यांच्या / तिच्या) तील सर्व नकारात्मक शक्ति व मतभेद ईश्वरी प्रकाशाने प्रज्वलित होऊन त्याचे सकारात्मक ऊर्जेत रूपांतर होऊन (त्यांच्या / तिच्या) कडे पाठवावी. (माझे पती/माझी पत्नी) शरीर, मन आणि आत्मा ह्याद्वारा व्यक्त होणारी ईश्वर रचित परिपूर्ण कृती आहे.

ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद

(दररोज वाचावे)

Copyright @ All rights reserved

## क्षमा - मित्र- मैत्रिणी, सहाध्यायी, सहकारी, शेजारी, अन्य

हे सर्वोच्च परमेश्वरा,
दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
(व्यक्तिचे नाव) चा उच्चतर आत्मा,
आपले सर्व अध्यात्मिक मार्गदर्शक व सहाय्यक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ.

मी आहे ते मी आहे

मी विनम्रतेने दैवी क्षमेसाठी कळकळीची विनंती करीत आहे.

(व्यक्तिचे नाव) जाणता- अजाणता हया जन्मी किंवा पूर्वजन्मी मी तुमच्याबरोबर आणि तुमच्या परिवाराबरोबर केलेल्या सर्व चुकांसाठी, दिलेल्या तीव्र दुःखासाठी कृपया मला क्षमा करावी.

माझ्या बरोबर व माझ्या परिवाराबरोबर तुम्ही केलेल्या सर्व चुकांसाठी मी क्षमा करीत आहे.

ईश्वरी प्रेम व आशीर्वाद सदैव तुमच्या बरोबर राहो. (३ वेळा)

कृपया शांततेत जा (३ वेळा)

आपल्यामध्ये शांती व सुसंवाद सदैव राहो (३ वेळा)

ईश्वरा, धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद

(आवश्यकतेनुसार वाचावे)



## क्षमा- पूर्व मित्र/मैत्रीण, पूर्व भागीदार, पूर्व पती /पत्नी

हे सर्वोच्च परमेश्वरा, दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा,
(व्यक्तिचे नाव) चा उच्चतर आत्मा
समस्त अध्यात्मिक मार्गदर्शक व सहाय्यक
आणि अध्यापक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ.

मी आहे ते मी आहे

ईश्वरा आम्हाला एकत्र आणल्याबद्दल धन्यवाद,
आमचे कर्म संतुलित करण्यासाठी धन्यवाद,
हया दैवी मार्गदर्शनाचा व योजनांचा मी
स्वीकार करीत आहे.

(नाव) जाणता अजाणता हया जन्मी किंवा पूर्व- जन्मी तुमच्या बरोबर किंवा तुमच्या परिवाराबरोबर केलेल्या सर्व चुका, दिलेले सर्व दुःख हयाबद्दल कृपया मला क्षमा करावी. माझ्याबरोबर व माझ्या परिवाराबरोबर तुम्ही केलेल्या सर्व चुकांसाठी मी क्षमा करीत आहे.

मी क्षमा करत आहे आणि विसरत आहे (३ वेळा)
आपल्यामध्ये शांती व सुसंवाद सदैव राहो (३ वेळा)
ईश्वरी प्रेम व आशीर्वाद तुमच्या आणि
तुमच्या परिवारा सोबत सदैव राहो (३ वेळा)
कृपया शांततेत जा (३ वेळा)

मी हे जाणीवपूर्वक स्वीकारीत आहे.

पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे,

ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद,

(आयुष्यभर अथवा निर्देशानुसार वाचणे)



**क्षमा : जेव्हा काळी जादू (ब्लॅक मॅजिक - BM)
किंवा सफेद जादू (व्हाईट मॅजिक - WM) किंवा
आत्म्याकडून आलेले प्रबळ सूक्ष्म संपर्क,
पूर्व जन्मातील आत्मे किंवा शाप ओळखले जातात,
जर BM किंवा शाप परिवाराला असेल तेव्हा संपूर्ण
परिवाराने वाचणे आवश्यक आहे.**

हे सर्वोच्च परमेश्वरा, दैवी पिता, दैवी माता,
माझा उच्चतर आत्मा, (व्यक्तिचे नाव) चा उच्चतर आत्मा
सर्व अध्यात्मिक मार्गदर्शक, सहाय्यक आणि अध्यापक,
समस्त उपचारक देवदूत,
महान कार्मिक मंडळ,

मी आहे ते मी आहे.

ईश्वरा धन्यवाद, आम्हाला एकत्र आणल्याबद्दल, धन्यवाद आम्हाला आमचे कर्म संतुलित करण्यास अनुमती दिल्याबद्दल, मी हया दैवी मार्गदर्शनाचा व योजनेचा स्वीकार करीत आहे.

जाणता - अजाणता, पूर्व जन्मी अथवा हया जन्मी मी तुमच्याबरोबर किंवा तुमच्या परिवाराबरोबर चुकीचे वर्तन केले असेल किंवा तीव्र दुःख दिले असेल तर त्यासाठी मी क्षमायाचना करीत आहे. हयामुळे तुम्हाला माझ्याशी किंवा माझ्या परिवाराशी अत्यंत चुकीची कृत्ये करावी लागली. आम्ही पुन्हा क्षमायाचना करीत आहोत.

माझ्याशी व माझ्या परिवाराशी केलेल्या सर्व चुकीच्या कृत्यांसाठी मी तुम्हाला क्षमा करीत आहे.

मी क्षमा करत आहे आणि विसरत आहे (३ वेळा)
आपल्यामध्ये सदैव शांती व सुसंवाद राहू दे.
ईश्वरी प्रकाश, प्रेम व आशीर्वाद तुमच्या सोबत व तुमच्या परिवारासोबत सदैव राहू दे,
कृपया शांततेत जा (३ वेळा)

मी हे जाणीवपूर्वक स्वीकारीत आहे.
पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे, पुष्टी होऊ दे.

ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद,

(संपूर्ण जीवनभर अथवा निर्देशानुसार वाचणे)



# क्षमा प्रार्थना

आरोग्य, सुयश, भावना

आणि

समृद्धि हयातील प्रबळ सूक्ष्म संपर्क

आणि

ऊर्जेतील अडथळे निष्फळ करण्यासाठी

**www.pranaviolethealing.com**